प्रतिदिन २५०० मे.टन गाळप क्षमतेच्या नवीन सहकारी साखर कारखान्याची प्रमाणित किंमत (Normative Cost) निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: ससाका-२०१६/प्र.क्र.२१५/३-स.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ एप्रिल, २०१८.

<u>वाचा:</u>- १) साखर आयुक्त, पुणे यांचे क्रमांक साआ/उपप कक्ष-१२/सह्याद्री ससाका धामोड/आ.प्र.मंजूरी/१८, दिनांक २८.०३.२०१८.
२) शासन निर्णय क्रमांक : ससाका-२६०१/प्र.क्र.२२१/३-स, दिनांक १८.०६.२००२.

<u>प्रस्तावना:</u>

सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता २५०० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमतेसाठी सदंर्भाधीन दिनांक १८.०६.२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ४८००.०० लाख इतकी प्रमाणित किंमत निश्चित केलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये विभागनिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. साखर कारखान्याची गाळप क्षमता २५०० मे.टन प्रतिदिन यासाठी रु.४८००.०० लाख इतके निश्चित करण्यात आलेले होते. यास्तव प्रमाणित किंमत निश्चित करण्याबाबत मा.मंत्री(सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता २५०० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमतेसाठी सदंर्भाधीन दिनांक १८.०६.२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ४८००.०० लाख इतकी प्रमाणित किंमत निश्चित केलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये विभागनिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. मा.मंत्री(सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

१. मा.मंत्री(सहकार)	-अध्यक्ष.
२. मा.अपर मुख्य सचिव(सहकार)	-सदस्य.
३. मा. साखर आयुक्त, पुणे	-सदस्य.
४. वसंतदादा शुगर इंन्स्टीट्युट, पुणे यांचे प्रतिनिधी	-सदस्य.
५. नॅशनल फेडरेशन ऑफ शुगर फॅक्टरी नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी	-सदस्य.
६. श्री.एस.सी.नातू, वरीष्ठ उपाध्यक्ष, मिटकॉन, पुणे.	-सदस्य.
६. संबंधित सहसंचालक (साखर), साखर आयुक्तालय, पुणे	-सदस्य सचिव.

०२. सदर समितीने साधारणत: सहकारी साखर कारखान्याकडून मान्यता प्राप्त संस्थांनी निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करुन शिफारस करावी. आवश्यकतेप्रमाणे प्रस्तावाची शिफारस वित्त विभाग किंवा मंत्रिमडळाकडे करावी.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१३०२०७९९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2018.04.17 13:05:52 +05'30'

(दिपक शि. देसाई)
उपसचिव (साखर), महाराष्ट्र शासन.
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा-२)/(लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) अपर मुख्य सचिव(सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महासंचालक, वसंतदादा शुगर इंन्स्टीट्युट, पुणे.
९) व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑ. शुगर फॅक्टरी, नवी दिल्ली.
१०) श्री.एस.सी.नातू, वरीष्ठ उपाध्यक्ष, मिटकॉन, पुणे.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) सहसंचालक (साखर), साखर आयुक्तालय, पुणे.
१३) उप सचिव वित्त विभाग व्यय-२/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई.
१४) कक्ष अधिकारी (२२-स, २५-स, १६-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) ३स, संग्रहार्थ.

****